


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ०५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२० ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# राज्यभरात पावसाचा रेकॉर्डब्रेक! सर्वत्र हाहाकार !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** राज्यभरात जवळपास सर्वच ठिकाणी तुफान पाऊस सुरु आहे. मुंबई शहर, उपनगरांसह कोकण, मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राला पावसाने झोडपले आहे. त्यामुळे जनजीवन ठप्प झाले आहे.

मुंबईत सोमवारी सकाळपासून पावसाने धुमाकूळ घातला आहे. हवामान विभागाने ४८ तासांसाठी मुंबईला रेड अलर्ट जारी केला होता. त्यामुळे बुधवारी सुद्धा पावसाची हीच स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.



**रेल्वे रुळावर पाणीच पाणी, लोकल ठप्प :** मुंबईत संततधार पावसामुळे रस्त्यांना नद्यांचे स्वरुप आले आहे. मुंबईकरांची पावसाने अक्षरश: दैना झाली आहे. लोकलसेवा ठप्प झाली असून मध्य रेल्वे मार्गावरील ठाणे ते सीएसएमटीच्या सर्व ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत.

**मुंबईकरांची पुरती दैना :** मध्य तसेच हार्बर रेल्वे मार्गावरील रुळ पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे प्रवाशांचा खोळंबा झाला आहे. मुंबईतील दादर हिंदू कॉलनी, सायन किंग्ज सर्कल, माटुंगा भागात तसेच उपनगरातील कुर्ला, चेंबूर मध्ये अनेक ठिकाणी गुडघाभर पाणी भरले आहे.

**ठाणे, कल्यामध्येही अतिवृष्टी, जनजीवन ठप्प :** ठाणे, कल्याण मध्ये देखील अनेक भागांत अतिवृष्टी झाली आहे. ठाण्याच्या डायघर गावातील काही घरांमध्ये पाणी शिरले आहे. कल्याणच्या शीळ रोडवर पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. ज्यामुळे वाहतुकीसोबतच सर्वच सेवा ठप्प झाल्या आहेत. तर गणेशमुर्ती कारखान्यात पावसाचे पाणी शिरल्याने गणपती मुर्तीचे मोठे नुकसान झाले आहे.

**कल्याण छत्रपती शिवाजी महाराज चौक जलमय :** कल्याण डोंबिवलीतील अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात पाण्याचा निचरा करण्यासाठी पंप ठेवलेला आहे, मात्र तो पंप बंद स्थितीतच आहे. रस्ता पूर्ण जलमय झाला आहे.

**पश्चिम महाराष्ट्रातही धुवाधार :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यात देखील मुसळधार पाऊस सुरु आहे. मुसळधार पावसामुळे मंगळवारी, १९ ऑगस्ट रोजी सकाळी काही प्रमुख रस्ते आणि कोकणाला जोडणारे दोन घाट वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. कोल्हापूर-गगनबावडा राष्ट्रीय महामार्ग पाणी आल्याने बंद केल्यामुळे या मार्गावरील एसटी सेवा रद्द करण्यात आली आहे.

**पुण्यात पावसाचे रौद्ररुप :** पुण्यामध्येही पावसाने नागरिकांची त्रेधा उडाली आहे. रस्त्यांवर पाणीच पाणी झाल्याने वाहतुकीचे तीन तेरा वाजले आहे. लोणावळा शहरात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. गेल्या २४ तासांत तब्बल १४२ मिमी पावसाची नोंद झाली. भुशी धरणाच्या सांडव्यावरून प्रचंड पाणी वाहत आहे.

**मराठवाड्यात सर्वदूर धुव्वाधार :** मराठवाड्यातही सर्वदूर धुव्वाधार सुरु आहे. अनेक भागांना पुराचा तडाखा बसला आहे. नांदेडात पुरामुळे ८ जण दगावले आहेत. तर लातूरमधील मौजे बोरमाव, धडकाल शिवारात पुरामुळे सुमारे ७०० हेक्टर जमिनीवरील माती खरडून गेली. सुमारे ३९० गावकऱ्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.

**बीड जिल्ह्यात नद्या नाले तुडूंब :** बीड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाची जोरदार हजेरी असल्याने नदी नाल्यां सह तलाव भरगच्च भरले आहेत नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे सोयाबीन सह अन्य शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**कोकणात पावसाचा कहर :** कोकणातही पावसाने कहर केला आहे. चिपळूणमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक परिसरात पाणी शिरलं आहे. यातच एक धडकी भरवणाऱ्या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे. एक महिला आणि तरुण पाण्यातून वाट काढत घराबाहेर पडताना दिसत आहेत. महिला व तरुणाची थरारकपणे सुटका करण्यात आली.

**रायगडमध्ये हाहाकार :** रायगडमध्येही अनेक ठिकाणी पावसाने जनजीवन ठप्प झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गाला फटका बसला असून अनेक ठिकाणी वाहतूक बंद करण्यात आली. गेली तीन चार दिवस सततच्या पावसाने रायगडला मोठा तडाखा दिल्याने रोहा तालुक्यातील नद्या-नाले मुसळधार पावसामुळे ओसंडून वाहत आहेत

# ठाणे जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा!

## नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, ठाणे :** ठाणे जिल्ह्याला दि.१९ ऑगस्ट २०२५ रोजी अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याकडून प्राप्त झाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सर्व विभागांमध्ये सतर्क ठेवण्यात आली आहे.

जिल्ह्यातील खाडी आणि नदी/नाला इ. पाण्याकाठच्या रहिवाशांनी सतर्क राहावे. नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी तसेच अत्यावश्यक कामासाठीच घराबाहेर पडावे. नागरिकांनी घाबरून न जाता कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी ०२२- २५३०१७४० किंवा ९३७२३३८८२७ या क्रमांकावर अथवा १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

आपत्ती अधिनियमाच्या तरतुदींच्या अनुषंगाने दि.१९ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व शाळा/महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अत्यावश्यक कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त उर्वरीत कर्मचाऱ्यांना कार्यालय सोडणेबाबत कार्यालयप्रमुखांनी त्यांच्या स्तरावरून निर्णय घेण्याबाबत कार्यालयप्रमुखांना निर्देशित करण्यात आले आहे. दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी शाळा, महाविद्यालयांच्या सुट्टीबाबत पावसाच्या अंदाजानुसार निर्णय घेण्यात येईल, असेही ठाणे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांची राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट

## अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा घेतला आढावा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बुलडाणा :** राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन अतिवृष्टीमुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी या भेटी वेळी राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण परिस्थितीची माहिती घेऊन पावसामुळे उद्भवलेली पूरस्थिती, वाहतुकीतील अडथळे, पिकांचे नुकसान आणि आपत्कालीन सेवांच्या कार्यवाहीची माहिती घेतली. आवश्यक तेथे राज्य आपत्ती प्रतिसादात दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके पाठवावीत अशा सूचना त्यांनी दिल्या. अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या लोकांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करावे. या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाने वेगाने कारवाई करावी, आशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. पावसामुळे बाधित होणाऱ्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अतिवृष्टी काळात विशेषतः नद्या, धरणे व पाणीपातळीवर सतत लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करून हवामान विभागाशी सतत संपर्क साधून येणाऱ्या पावसाचा अंदाज जनतेपर्यंत वेळीच पोहचवण्यात याव्यात असेही मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, मदत व बचाव कार्य या विषयी माहिती दिली.

# शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय संस्था कळंब धाराशिव वतीने सत्कार






**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१९, कळंब (धाराशिव) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव २१ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. राजनीश के. कामत कुलगुरू डॉ.होमी भाभा विद्यापीठ मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांचा शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय संस्था कळंब वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अधीक्षक हनुमंत जाधव आदी सभा सदस्य डॉ.संजय कांबळे व रमेश भालेकर उपस्थित होते.

# वासुंदे येथे वाळू तस्करीच्या वादत युवकाला मारहाण !

## पोलिसांची निष्क्रियता संशयास्पद, जनतेच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९,पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसर गुन्हेगारीच्या विळख्यात सापडला आहे. वाळू तस्करीने कळस गाठला असून, स्थानिक पोलीस यंत्रणा सर्व काही डोळेझाक करून नव्हे, तर थेट गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. समाजाचे रक्षक म्हणवणारे पोलीस खरेच गुन्हेगारांचे साथीदार आहेत का? त्यांना गुन्हेगारांच्या काळ्या पैशाची नशा चढली आहे का? असा थेट सवाल नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

टाकळी ढोकेश्वर हे गाव पारनेर तालुक्यातील मोठे बाजारपेठेचे केंद्र आहे. जवळपास ४० गावांचा संपर्क इथे असतो. येथे शाळा, महाविद्यालये आणि इंजिनिअरिंग कॉलेजेस आहेत. गुन्हेगारीने या परिसराला विळखा घातला आहे. वाळू तस्करीचे ट्रॅक्टर आणि ट्रक रात्रीच्या अंधारात बिनधास्त फिरतात. हे सर्व काही पोलिसांच्या आशीर्वादाने चालते. माध्यमांमधून आवाज उठवला तरी पोलीस आणि महसूल प्रशासन झोपेचे सोंग घेऊन बसले आहे. हे निष्काळजी अधिकारी गुन्हेगारांच्या पगारीवर चालतात का? स्थानिकांच्या चर्चेनुसार, पोलीस गुन्हेगारांसोबत पार्टनरशीपमध्ये आहेत, अशी स्थिती आहे. हा भ्रष्टाचाराचा कळस आहे, जिथे कायद्याचे रक्षकच कायद्याचे भक्षक झाले आहेत.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गुन्हेगारांना पोलिसांचे संरक्षण मिळत असल्याने त्यांचे मनोधैर्य गगनाला भिडले आहे. दिवसाढवळ्या व रात्री वाळू तस्करीसाठी वाहने फिरतात. यामुळे कायदा व सुव्यवस्था पुर्णपणे कोलमडली आहे. नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या, पण पोलिसांकडून कारवाई मात्र नाममात्र असते. उलट, गुन्हेगारांना नरमाई दाखवली जाते. पोलिस गुन्हेगारांना पाठीशी घालतात,मग सामान्य माणसांनी कुणाकडे न्याय मागायचा? हा थेट हातमिळवणीचा पुरावा आहे, जिथे पोलिसांच्या भ्रष्ट हातांनी गुन्हेगारीला पंख फुटले आहेत.

या गुन्हेगारीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली, कठोर कारवाईची मागणी केली, पण तरीही पोलिस प्रशासन शांत का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरातील नागरिकांना न्याय मिळावा म्हणून आवाज उठवणे गरजेचे आहे. भ्रष्ट यंत्रणा उखडून फेकण्याची वेळ आली आहे. अन्यथा, गुन्हेगारीचा हा कहर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# घराघरात पाणी, रस्त्यावर तलाव ; नालेसफाईशिवाय दिवा बुडतोय : रोहिदास मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १९, दिवा (ठाणे) :** दिव्यात नालेसफाई झाली नसल्यामुळे यंदा पुन्हा एकदा नागरिकांचे हाल सुरू झाले आहेत. चाळी-चाळीत घरांमध्ये पाणी घुसले, रस्ते तुंबले, तर बेडेकर नगर, गणेश नगर, बी.आर. नगर, मुंब्रा देवी कॉलनी, डीजे कॉम्प्लेक्स, दिवा आगासन मुख्य रस्ता अशा अनेक भागात पाणी साचून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

वारंवार तक्रारी करूनही ठाणे महापालिकेने डोळेझाक केली. दरवर्षी प्रमाणे कोट्यवधी रुपयांचा निधी नालेसफाईसाठी मंजूर होतो, कंत्राटदारांना मोबदला मिळतो, पण प्रत्यक्षात नाले मात्र साफ होत नाहीत. यावर्षी तर फक्त नावालाच पहिला फेरा झाला आणि त्यानंतर सफाई थांबली. महापालिकेचा संपूर्ण कारभार भ्रष्टाचाराने पोखरलेला असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे



कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲडव्होकेट रोहिदास मुंडे यांनी महापालिकेच्या या निष्काळजीपणावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक आयुक्त आणि ठेकेदार यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमवेत प्रत्यक्ष नालेसफाई करून महापालिकेची पोलखोल केली. नागरिकांसमोरच श्लोक नगर दातिवली नाळा, रिलायन्स टॉवर येथील नाळा, टाटा पॉवर लाईन रोड नाले दाखवत महापालिकेचे दिंडवडे निघाले अशी बोचरी टिप्पणी करत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. दिव्यातील नागरिक त्रस्त आहेत. महापालिका मात्र निद्रिस्त आहे! भ्रष्टाचार आणि ढिलाईचा हा खेळ तातडीने थांबवून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रस्त्यावर उतरून मोठा आंदोलन उभारेल, असा इशारा ॲडव्होकेट रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. नालेसफाईच्या दौऱ्या वेळी कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲडव्होकेट रोहिदास मुंडे, शहर प्रमुख सचिन पाटील, विभागप्रमुख योगेश निकम, उपविभाग प्रमुख संदीप राऊत, अशोक अमोडकर, अमोल म्हात्रे, सचिन केसरकर, आकाश विचारे, शैलेश कदम, विलास मुलम, रंजना देसाई, तेजस ओपले, पद्मा चव्हाण, अनिता कनेरे, शेखर पालशेट्टी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# संपादकीय



## भारतीय माहिती क्रांतीचे जनक

आज २० ऑगस्ट, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आज ८१ वि जयंती. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून तो दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# जीवघेण्या डीजेवर कायमस्वरूपी बंदी हवी !




सर्वोच्च न्यायालयाने डीजे वाजवण्यावर निर्बंध आणले आहेत, तर मुंबई उच्च न्यायालयाने डीजेवर याआधीच बंदी घातली आहे. ही बंदी कायम ठेवून गणेशोत्सवादरम्यान डीजे अथवा डॉल्बी वाजवलयास मंडळावर कडक कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने नुकतेच दिले आहेत. कौटुंबिक कार्यक्रम असो वा सांस्कृतिक किंवा एखादा सार्वजनिक उत्सव वा महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी अशा ठिकाणी लोकांची गर्दी जमवायची असेल, तर डीजे वाजलाच पाहिजे असे काहीसे समीकरण गेल्या काही वर्षांत तयार होऊ लागले आहे. प्रचंड आवाजामुळे ध्वनी प्रदूषणासह आरोग्याची हानी करणारा डीजे हळूहळू आधुनिक संस्कृतीचा अविभाज्य भाग बनू लागला आहे. पळ;पळ;ल;विकल;मार्च-एप्रिल महिन्यात लगीन सराई जोमाने होती अशा ठिकाणी मित्र परिवाराला खुश करण्यासाठी मद्यपानाच्या मेजवान्यांसह थिरकण्यासाठी वरातीत डीजेची सोय केली गेल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. मुंबईसारख्या ठिकाणी गल्लीबोळांतही डीजे वाजू लागला कि कार्यक्रम कोणाचा आहे हे न पाहता नाचण्यास उत्सुक असणाऱ्या मंडळींचे पाय डीजेच्या आवाजाच्या दिशेने वळताना पाहायला मिळतात. डीजेची व्यवस्था करायची तर खर्चही अधिक येतो, अशावेळी बाकीच्या खर्चाशी तडजोड करून डीजेला प्राधान्य देणारी मंडळीही हल्ली बरीच पाहायला मिळतात. सार्वजनिक उत्सव, महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी यानिमित्ताने काढल्या जाणाऱ्या मिरवणुका यांमध्ये डीजे वाजवणे जणू अनिवार्यच झाले आहे. एखाद्या देवतेच्या गाण्याने वाजायला सुरुवात करणारा हा डीजे हळूहळू रंगात येऊन कधी 'मुन्नी बदनाम हुई', 'एक बोतल व्होडका काम मेरा रोज का' यांसारख्या गाण्यांवर सरकतो हे कळतही नाही आणि या मिरवणुकीत चित्रविचित्र अंगविक्षेप करत नाचणारी मंडळीही अशी गाणी वाजू लागली की अधिक जोमाने धिंगाणा घालू लागतात. आपण कोणत्या महापुरुषाच्या मिरवणुकीत नाचतो आहोत, त्यांची शिकवण काय, आपल्याला असे थिरकताना पाहून त्या महापुरुषांच्या आत्म्याला किती वेदना होत असतील याचा तिळमात्र विचार या मंडळींकडून केला जात नाही. गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत मंगलवाद्यांसह काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत मोजकीच मंडळी दिसतील मात्र ज्या मिरवणुकीत डीजे वाजवला जातोय अशा ठिकाणी आजूबाजूला हजारोंचा समुदाय पाहायला मिळतो.

डीजेमुळे आरोग्यावर होणाऱ्या भयंकर परिणामांमुळे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच डीजे वाजवण्यावर बंधने आणली आहेत. मिरवणुकीत डीजे वाजवण्यास स्वतंत्र परवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे, डीजेच्या आवाजाला ४० डेसिबल्सची मर्यादा घालून देण्यात आली आहे; मात्र ही मर्यादा सर्वत्रच ओलांडली जाते. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दाखल घेत अनेक वेळा या डीजेंवर पोलिसांकडून कारवाईही केली जाते, तरीही डीजे वाजवणाऱ्यांचे प्रमाण काही कमी झालेले नाही. नुकत्याच पार पडलेल्या दहीकाला उत्सवाच्या निमित्ताने मुंबई, ठाणे आणि पुणेसह अनेक शहरांत लाखोंची बक्षिसे मिळवून देणाऱ्या दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या त्यापैकी जवळपास ९० टक्के हंड्या या राजकीय मंडळींनी पुरस्कृत केलेल्या होत्या. यातील बहुतांश हंड्यांमध्ये चढ्या आवाजात डीजे वाजत होते. अनेक हंड्यांना मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील नेतेमंडळींनीही भेटी दिल्या; मात्र डीजेवर असणाऱ्या बंदीचा या सर्वांनाच विसर पडला होता. डीजेचा आपल्याला त्रास नको म्हणून काही मंत्र्यांनी चक्क कानात कापसाचे बोळे भरल्याचे काही पत्रकारांनी टिपले. आपलाच विचार करणारी ही मंडळी सामान्य जनतेचा विचार केव्हा करणार आहेत असा संतप्त सवाल यानिमित्ताने नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. सण-उत्सवांच्या निमित्ताने वाजणाऱ्या डीजेचा सर्वाधिक त्रास होतो तो जेष्ठ नागरिकांना. डीजेवर न्यायालयाने घातलेल्या बंदीचा विचार करून सरकारने त्यावर ठोस उपाययोजना करावी यासाठी साताऱ्यातील जेष्ठ नागरिक संघाने गांधी मैदान ते पोवई नाका असा भर पावसात निषेध मोर्चा काढल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

यंदा नाशिकमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीत आलेल्या नितीन रणशिंगे या २३ वर्षीय तरुणाचा नाकातोंडातून रक्तस्त्राव होऊन दुर्दैवी मृत्यू झाला. नितीनला अन्य आजारही असले तरी त्याच्या मृत्यूला डीजेचे निमित्त झाले. सोलापुरात एका मिरवणुकीत नाचताना अभिषेक बिराजदार नावाच्या २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याचे हल्लीच वाचनात आले. मागच्या वर्षी जानेवारी महिन्यात सोलापुरात एका मुलीच्या हळद समारंभात डीजेच्या आवाजामुळे मुलीच्या वडिलांचाच मृत्यू ओढवला. याच वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीसाठी पुण्यातून १५ डीजे मागवण्यात आले होते. डीजेच्या जीवघेण्या आवाजामुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला. ज्यामुळे त्याच संध्याकाळी कानाच्या त्रासामुळे परिसरातील ७० रुग्णालयांत मिळून २५० रुग्ण भरती झाले. नागपूरमध्ये एका लग्नाच्या वरातीत डीजे वाजत असताना डीजेच्या आवाजातील कंपनांमुळे जवळची एक मोठी भिंत कोसळली, ज्यामुळे वरातीत सहभागी झालेले कित्येक जण रक्तबंबाळ झाल्याचा व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला होता. याशिवाय डीजेवर थिरकणाऱ्या तरुणांमध्ये आपापसांत भांडणे होऊन एकमेकांची डोकी फोडण्याच्या, आवाज वाढवण्यासाठी किंवा मनासारखी गाणी लावण्यासाठी डीजे वाजवणाऱ्यावर दबाव आणण्याच्या, प्रसंगी त्याला मारहाण करण्याच्या घटना सातत्याने घडत असतात.

डीजेच्या जीवघेण्या आवाजामुळे प्रचंड प्रमाणात ध्वनीप्रदूषण तर होतेच शिवाय या आवाजातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे खिडक्या आणि तावदानांच्या काचांना तडे जातात, लहान मुले, वयोवृद्धांच्या हृदयाला त्रास होतात, अनेक यंत्र बंद पडतात, मांडणीवरील भांडी कोसळतात, भिंतींनाही तडे जातात, रक्तदाब वाढू शकतो, हृदयरोग असणाऱ्या मंडळींना डीजेच्या आवाजामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. कर्कश आवाजामुळे कानाच्या अंतर्गत पेशींना इजा होऊन बहिरेपणा येऊ शकतो. डीजेमुळे गरोदर स्त्रियांचे हृदयाचे ठोके वाढून वेळेपूर्वी प्रसूती होण्याचे, प्रसंगी गर्भापात होण्याचीही शक्यता असते. त्वचारोग तज्ज्ञांच्या मते डीजेच्या आवाजामुळे त्वचारोगही बळावतात. डीजेचा आवाज सतत कानी पडल्याने चिडचिड होणे, निद्रानाश, नैराश्य येणे यांसारखे मानसिक विकार उद्भवण्याचा धोका असल्याचे मानसोपचारतज्ञ सांगतात. डीजेमुळे होणारी सामाजिक, शारीरिक आणि मानसिक हानी लक्षात घेऊन न्यायालयाने यावर निर्बंध आणले असले तरी लोकांच्या हौसेपुढे ते सर्रासपणे पायदळी तुडवले जातात. गेल्या काही वर्षांत वाढदिवस, लग्न, मिरवणूका यांमध्ये डीजे वाजवण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे, ज्यामुळे घरच्या कार्यक्रमात डीजे वाजवणे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले आहे. सण उत्सवांत डीजे वाजवणे हा आपला जन्मसिद्ध अधिकारच असल्याची भावना आजच्या पिढीत निर्माण होऊ लागली आहे. अशावेळी पोलिस प्रशासन, न्यायालय यांच्याकडून घालण्यात आलेले नियम लोकांना दडपशाहीचा भाग वाटतात, राजकीय नेतेमंडळीही तरुणांच्या पाठीशी उभे राहून त्यांना बिनधास्तपणे डीजे वाजवण्याचे आवाहन करतात. काही तासांच्या मौजेसाठी लोकांना दीर्घ आजार देणारी, प्रसंगी त्यांचा जीव घेणारी असली प्राणघातक प्रतिष्ठा काय कामाची ? त्यामुळे डीजेवर कायमस्वरूपी बंदी येण्यासाठी राजकीय मंडळांची इच्छाशक्ती, पोलीस प्रशासनाचे सहकार्य आणि नागरिकांचा सहभाग नितांत गरजेचा आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# उत्सवांना विधायक वळण द्या...

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ज्या हेतूने गणेशोत्सव, शिवजयंती असे उत्सव सुरू केले त्याच्यामागे फार मोठी भूमिका होती आणि विचार होता. काळानुसार उत्सवाचे स्वरूप बदलले हे मात्र नक्की. कार्यक्रमातून उत्सवामधून जे काही फलित व्हायला हवे ते होत नाही. अनेक ठिकाणी गणेशोत्सवात रस्त्यामधून मंडप टाकले जातात वाहतुकीला अडथळ्याचे ठरतात. उत्सवाची वर्गणी मागण्यासाठी बऱ्याच वेळा जबरदस्ती केली जाते मिरवणुकीमध्ये डीजेचा डॉल्बीचा लेझर किरणांचा वापर केला जातो आरोग्य दृष्टीने ते घातक असते. आंधळेपणा, बहिरेपणा, उच्चदाब असणाऱ्यांना बऱ्याच वेळा धोका झालेला आहे काही प्रकरणात तर मृत्यू ओढवलेला आहे. मिरवणुकीमध्ये बऱ्याच ठिकाणी मद्यपान करून दिवसभल अर्थहीन गाण्यावर नाच केला जातो, सर्वच ठिकाणी सारखी परिस्थिती असते असे नाही. काही मंडळांमध्ये अतिशय शिस्तबद्ध पणे आरती केली जाते आणि कार्यक्रमाची आखणी केली जात असते. परंतु अशा मंडळांची संख्या फारच कमी असते. हे प्रमाण ८०/२०% असे असते अनेक ठिकाणी चांगल्या कार्यक्रमाचे आयोजनही केलेले असते.

गेल्या काही वर्षांमध्ये अशा उत्सवामध्ये राजकारणी नेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे उत्सवाचे स्वरूपच पालटले आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळतात त्यामुळे वेगळ्या प्रकाराने कार्यक्रमाचे आयोजन होते. त्यात त्यांचाही सहभाग असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमा नियमाचे बंधन पाळले जात नाही आणि अधिकारी असहाय्य असतात. होणाऱ्या त्रासामुळे मात्र बऱ्याच वेळा जनता नाराज असते. आणि म्हणूनच मग उद्विग्न अवस्थेतून संतापाने बंद करा हा गणेशोत्सव अशा प्रतिक्रिया काही जणांकडून उमटतात. अर्थातच असे आपले धार्मिक उत्सव बंद होणे शक्य नाहीच फक्त त्यात काही सुधारणा आणि विधायक कार्य होणे अपेक्षित आहे.

गणेशोत्सव म्हणजे आनंद आणि चैतन्याचा उत्सव असतो.आणि उत्साह ही असतो.

गणपतीला विद्येची देवता,चौसष्ट कलांचा अधिपती आणि विघ्नहर्ता, संकट विमोचक म्हणतात. आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करताना श्री गणपतीचे पूजन करतो आपले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना श्री गणपती समोर करतो.

गणपती माझा नाचत आला, गणपती बाप्पा आले घरा, घराचे मंदिर झाले.. बघा, असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो. महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता.

गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप १८९३ सालापासून मिळाले त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले. लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला.

राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे,पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी.जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो,

फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात. गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी.

उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये. असे म्हणण्याचा प्रघात आहे .कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक ठिकाणी महापालिकांनी पी.ओ.पी. गणेश मूर्तीवर बंदी आणलेली आहे. प्रदूषण महामंडळा कडून त्याविषयी आदेश काढले जातात.


**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

गणेशोत्सव हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे. धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट, रोषणाई, डी.जे.च्या तालावर कर्कष्य गाणी, हे प्रमाण वाढले आहे. बाजारात सिंगल यूज प्लास्टिक मध्ये सजावटीच्या प्लास्टिकच्या फुलांचा समावेश नसल्याने बाजारपेठेचत सर्रास विकले जातात.

लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली,त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा झाला आहे.अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्षाचे पठण करतात. काही ठिकाणी अथर्वशीर्ष पठणाच्या स्पर्धा घेतल्या जातात. काही वर्षापूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते. निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे, रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात.

डी.जे.च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते.उत्सव साजरा करण्यातूनच आनंद, समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक, सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको.

उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोलची नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी.

उत्सवात आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते. आरास करतानाही ती पर्यावरण पूरक तसेच आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे. सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी.जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे बघायला हवे. रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही ही काळजी हवी.

मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तात्पुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्रामपंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे.

अपप्रकर घडणार नाही अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही याची काळजी मंडळाचे कार्यकर्त्यांनी घ्यावी.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्वांनी एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण, उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान ठेवायला हवे. आपल्या संस्कृतीला शोभेल असेच धार्मिक आणि विधायक कार्यक्रम आखून उत्सव साजरे व्हावेत.

अशा प्रकारचे उत्सव, सण, हा सर्व आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. ठिकठिकाणी गणपती मंडळांनी या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आता शासनाने गणेशोत्सवाला राज्याचा उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांचा कार्यक्रमास सहभाग असला तरी त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप बिघडणार नाही याची दक्षता घ्यायला हवी.

राज्य उत्सव म्हणून जिल्ह्या जिल्ह्यात उत्कृष्ट विधायक कार्य करणाऱ्या, देखावे सादर करणाऱ्या, आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना बक्षिसे जाहीर करून त्यांचा सत्कार करावा त्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करण्याची मंडळांमध्ये चढाओढ लागून मंडळाच्या कामात शिस्त निर्माण होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**मोरया.. मोरया..**
**बोला गणपती बाप्पा मोरया.. मोरया...**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मिरा भाईंदरचे कार्यसम्राट, प्रथम आमदार गिल्बर्ट मेंडोंसा यांचे निधन



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१९, मिरा भाईंदर :** मीरा भाईंदरचे पहिले आमदार गिल्बर्ट जॉन मेंडोंसा यांचे दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी आरोग्याच्या गुंतागुंतीमुळे निधन झाले. निधनापूर्वी त्यांना ठाण्यातील मुंबईतील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

**गिल्बर्ट मेंडोंसा यांच्या जीवनातील प्रमुख वैशिष्ट्ये**

सुरुवातीचे जीवन आणि कारकिर्द : मेंडोंसा हे एका व्यावसायिक कुटुंबातील होते आणि त्यांनी १९७८ मध्ये मीरा-भाईंदरचे सरपंच म्हणून त्यांचा राजकीय प्रवास सुरू केला.

मीरा भाईंदरचे पहिले आमदार : २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (एनसीपी) तिकिटावर विधानसभा निवडणूक जिंकून ते मीरा भाईंदरचे पहिले आमदार झाले.

वाहतूक कनेक्टिव्हिटी : मीरा रोड रेल्वे स्टेशनवरून लोकल ट्रेन सेवा सुरू करण्याच्या मोहिमेसह या प्रदेशात वाहतूक कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू करण्याचे श्रेय मेंडोंसा यांना देण्यात आले.

शिवसेना संघटना : नंतर, ते शिवसेनेशी जोडले गेले आणि मीरा भाईंदर महानगरपालिका निवडणुकीत सक्रिय भूमिका बजावली.

**श्रद्धांजली आणि शोकसंदेश**

राष्ट्रवादी चे नेते  शरद पवार ह्यांनी ही त्यांच्या मिरा भाईंदर मधील कार्याचे व नागरिक सुविधा  योगदानाचे स्मरण केले.

भाजप आमदार नरेंद्र मेहता : मेंडोंसा  यांचे सार्वजनिक सेवेतील समर्पण, सामाजिक कार्याप्रती निष्ठा आणि लोकांशी वैयक्तिक संबंध यांचे कौतुक केले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक : मेंडोंसा यांचे वर्णन मीरा भाईंदरच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान देणारे एक मजबूत व्यक्तिमत्व म्हणून केले.

काँग्रेस नेते व पूर्व आमदार मुजफ्फर हुसेन : मेंडोंसा  यांची सार्वजनिक सेवेतील वचनबद्धता आणि त्यांच्या दयाळू स्वभावाचे स्मरण केले. सततच्या पावसामुळे त्यांचे अंतिम संस्कार बुधवार, दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी सायं ४ वा. भाईंदर पश्चिम चर्चमध्ये होईल.

## गणेशोत्सव २०२५ साठी परिमंडळ-३ कल्याणतर्फे समन्वय बैठक
## ध्वनी प्रदूषणावर लघुपट सादर



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१८, कल्याण (ठाणे) :** दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी कल्याण पश्चिम येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात दुपारी ३ ते सायं. ६.३० या वेळेत पोलीस उपायुक्त परिमंडळ-३, कल्याण आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव-२०२५ साठी महत्त्वपूर्ण समन्वय बैठक पार पडली. या बैठकीत ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम या विषयावर आधारित लघुपट तसेच पावर पॉइंट प्रेझेंटेशन (व्हिडिओ व्हॉइसओव्हर) सादर करण्यात आले. यात डीजे-मुक्त उत्सव, कायद्याची माहिती, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, शासन नियमावली तसेच मा. पोलीस महासंचालकांचे परिपत्रक याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत कल्याण-डोंबिवली परिसरातील खाजगी व सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी, मेळा संघाचे प्रतिनिधी, गणेशभक्त, पोलीस मित्र, शांतता समिती सदस्य तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुमारे ४०० ते ५०० लोकांनी या समन्वय बैठकीत सहभाग नोंदवला. गणेश मंडळांना उत्सवामध्ये येणाऱ्या अडचणींसंदर्भात शासनातील व संबंधित अधिकाऱ्यांनी थेट संवाद साधून त्या समस्यांचे निरसन केले. या प्रसंगी संजय जाधव, पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण, अभिनव गोयल, आयुक्त केडीएमसी, पोलीस उपायुक्त वाहतूक ठाणे पंकज शिरसाठ, प्रांत अधिकारी विश्वास गुजर, तहसीलदार सचिन शेजाल, उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यासह शासनातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण-डोंबिवली, वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी व प्रभारी अधिकारी देखील हजर होते. बैठकीचे शिस्तबद्ध आयोजन परिमंडळ-३ कल्याण मधील अधिकारी व अंमलदारांनी केले.

## बाबा अमरनाथ मंदिरात श्रावण सोमवार निमित्त सजावट व प्रसाद वाटप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील सालाबादप्रमाणे याही वर्षी अमरनाथ मंदिरात अमरनाथ ग्रुपच्या वतीने श्रावण महिन्यात पूजा अभिषेक व शेवटच्या सोमवारी भंडाऱ्याचे महाप्रसादाचे आयोजन ग्रामस्थ व बाबा अमरनाथ ग्रुपच्या वतीने यथासांग, आनंदमय वातावरणात जय जय भोले बाबाच्या गजरात पार पडला जातो. लासलगाव येथील पोलिस स्थानकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे आणि  सोनिया होळकर चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्षा सोनिया होळकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. तसेच लासलगाव आगार प्रमुख सविता काळे, लासलगाव पोलिस स्थानकाचे पोलिस नाईक बारगळ उपस्थित होते. बाबा अमरनाथ ग्रुपचे सदस्य दत्तात्रय भांबारे यांनी सजावट केली बम बम भोले या जयघोष करून प्रसादाचे वाटप करण्यात आले.मंदिराचे बांधकाम सुरू असल्याने या वर्षी चुरम्याचा प्रसाद करण्यात आला. सजावट पाहण्यास महिलांची व बालगोपालाची गर्दी बघावयास मिळाली. बाबा अमरनाथ ग्रुपचे सर्व सदस्यांनी मोलाचे योगदान देण्यात आले.

## धोम धरणातून १० हजार क्युसेक विसर्ग कृष्णेला महापूर

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१९, वाई (सातारा) :** धोम धरणाचे पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस चालू असून धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा वाढत चालला आहे. धोम धरणाच्या पाण्याची पातळी नियंत्रित ठेवणे करिता सद्यस्थितीत नदीपात्रामध्ये १० हजार क्युसेकने पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती सातारा सिंचन विभाग धोम धरण पूरनियंत्रण कक्षाने कळवली आहे. धरणातून कृष्णा नदीत सोडलेला विसर्ग व धरणाखालील मुक्त पाणलोट क्षेत्रातील येणारे पाणी विचारात घेऊन नदीमध्ये विसर्ग वाढवला असल्याने कृष्णा नदीला महापुराचे स्वरूप आले आहे. कृष्णा नदी पात्रातील गणपती घाट छोटा पूल चिंधवली गाव पूल मर्ढेगाव पूल खडकी गाव पूल ते पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने त्या गावातील ग्रामस्थांनी सतर्क रहावे असे आवाहनही करण्यात आले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून विद्युत पंप जनावरे राखणारे नदीकाठची घरे छपरे तसेच मासेमारीसाठी जाणाऱ्या लोकांनी सावध राहावे. धोमधर्णाखाली असलेल्या वाई शहरातून कृष्णा नदी वाहते गणपती घाटावर महागणपतीचे महागणपतीचे मोठे मंदिर असून गणपतीच्या पायाला पाणी लागले आहे. कृष्णा नदीला महापूर आल्याने पूर बघण्यासाठी गणपती घाटावर व कृष्णा फुलावर नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. कृष्णा नदी काठावरच्या सर्व गावांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे.

# पाटण सावंगीच्या ग्रामीण रुग्णालयाचे पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** सावनेर तालुक्याच्या पाटणसांगवी येथील प्रतीक्षेत असलेल्या ३० खाटांच्या नवनिर्मित ग्रामीण रुग्णालयाचे लोकार्पण दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. आशिष देशमुख, जिल्हाधिकारी विपीन इटणकर, नागपूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निवृत्ती राठोड, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, सरपंच रोशनी ठाकरे, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आमदार टेकचंद सावरकर, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे आदी मान्यवर प्रामुख्याने मंचकावर उपस्थित होते. सावनेर तालुक्यात शासकीय ग्रामीण रुग्णालय नव्हते. तसेच पाटण सावंगी परिसरात ग्रामीण आरोग्याची पाहिजे तेवढी सुविधा नव्हती. महामार्ग असल्याने वेळोवेळी अपघात झाला.

अपघातग्रस्त नागरिकांना व इतर नागरिकांना थोडा कमी जास्त आरोग्याची गोष्ट आढळून आली तर नागपूरला जावं लागे. ही बाब शासनाच्या लक्षात आली व येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागी गरज असलेले ग्रामीण रुग्णालय मंजूर होऊन इमारत बांधकाम पूर्ण झाले. ११ वर्षे होऊनही ग्रामीण रुग्णालय सुरु होतं नसल्याने चर्चा रंगू लागली. २०२० मध्ये कोरोनाने दहशत माजवली तेव्हा ग्रामीण रुग्णालय शोभेची वस्तू बनून त्रस्त लोकांना रडवत होती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत हा गाजला. निवडून येताच आमदार आशिष देशमुख यांनी पुढाकार घेऊन शासनाला वेळोवेळी योग्य पाठपुरावा केला. ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीत काही कमतरता दिसल्याने शासनातर्फे १ कोटी २० लाख रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला. त्यातून कमतरता भासलेले कामे करवून तात्काळ ग्रामीण रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे फीत कापून लोकार्पण करुन झाले, फलकाचे ही उदघाट्न केले गेले. मंचावर उपस्थित होऊन दीप प्रज्वलन करुन रीतसर लोकार्पण झाल्याचे जाहीर करण्यात आले.आयुष्यमान कार्ड वितरित करण्यात आले. क्षयरोग लाभार्थ्यांना किट वितरित करण्यात आल्या. कार्यक्रमाला पालकमंत्री बावनकुळे, आमदार डॉ.आशिष देशमुख, खासदार शामकुमार बर्वे यांनी मार्गदर्शन केले. आमदार डॉ. आशिष देशमुख हे जनतेसाठी अहोरात्र झटत आहे. २८८ आमदारांपैकी पहिल्या १० आमदारांमध्ये त्यांचे कार्य उत्तम आहे. आरोग्यसेवा ही सर्वात मोठी सेवा असून याचा लाभ गरजू रुग्णांना मिळणार आहे. या रुग्णालयात उपलब्ध असलेल्या डॉक्टरांनी रुग्णांना सर्वोत्तम सेवा प्रदान कराव्यात. या ग्रामीण रुग्णालयाच्या विकासासाठी आणखी सव्वा करोड देत आहो असे वक्तव्य महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केले.

या भागात दर्जेदार वैद्यकीय उपचार सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे शक्य होणार आहे. सावनेर-कळमेश्वर क्षेत्रात निरंतर विकासकार्य आणि जनतेच्या प्रगतीसाठी मी कटिबद्ध आहे. या क्षेत्रातील जनता व शेतकरी निरोगी राहावेत, ही माझी प्रामाणिक इच्छा आहे. पाटणसावंगीला आपण केंद्रबिंदू मानून या परिसराचा विकास करणार आहे.ग्रामीण रुग्णालय असो, स्मशान भूमी सौंदरीकरण असो, बाजारपेठ असो, गणेश मंदिर जीर्णोद्धार असो, विकासापासून कोसो दूर राहिलेल्या या परिसराचा आपण कायापलट करु. पाटणसावंगी ग्रामपंचायत सरपंचांनी नगरपंचायतचा ठराव दयावा, आपण नगरपंचायत बनवून अजून विकास करू तसेच रोजगारच्या संधी उपलब्ध करून देऊ. सावनेर विधानसभा क्षेत्राचा न भूतो, न भविष्यती विकास करू, असे प्रतिपादन आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांनी मार्गदर्शन यावेळी केले.ग्रामीण रुग्णालय, पाटणसावंगी हे ३० खाटांनी सुसज्जित असे रुग्णालय असून येथे बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभाग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जनरल मेडिसिन विभाग, स्त्रीरोग विभाग, बालरोग विभाग, अपघात विभाग, शस्त्रक्रियागृह, कुटुंब कल्याण, पॅथॉलॉजी, क्ष-किरण, लसीकरण, पट्टीबंधन अशा अनेक सुविधांचा लाभ रुग्णांना मिळणार आहे.

मंचकावर तहसीलदार अक्षय पोयाम, नागपूर जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष अशोक धोटे, अशोकराव इंगोले, माजी जि.प. सदस्य विजय देशमुख, किशोर चौधरी, सुरेंद्र शेंडे, मधु केदार, समीर उमप, प्रमोद पिंपळे, विलास महल्ले, चंद्रशेखर लांडे, राजू घुगल, आशिष फुटाणे, ज्ञानेश्वर गुडदे, उज्वल करडभाजणे, मंदार मंगळे, रामराव मोवाडे, रोहित मुसळे, विलास ठाकरे, शत्रुघन सावरकर, पंकज भोंगाडे, धनंजय मुसळे, अनंता पडाळ, प्रवीण बोबडे, रवींद्र हटकर, नितीन मोहगावकर, इमेश्वर यावलकर, प्रदीप सातपुते आरोग्य कर्मचारी, इतर मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.निवृत्ती राठोड आभार प्रदर्शन डॉ.दानिश शेख यांनी तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर सोनसरे, प्रविण डोंगरे, शिल्पा खोरगडे, डॉ. दानिश शेख, डॉ.राहूल पटले, डॉ.तुषार खिरेकर, डॉ.अक्षय जुनघरे, डॉ.शुभम जयस्वाल, तेजस्विनी गाठे आदींनी प्रयत्न केले

# पर्यावरणपूरक व नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करा - आयुक्त गोयल



## यावर्षी प्रथमच गणेशोत्सवाच्या सर्व परवानग्या ऑनलाइन

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१९, कल्याण (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) आयुक्त अभिनव गोयल यांनी यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणपूरक पद्धतीने व नियमांचे पालन करून उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात केडीएमसी व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. आयुक्त गोयल यांनी यावेळी सांगितले की, यावर्षी प्रथमच गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या - महापालिका, पोलीस आणि महावितरण विभागाच्या - पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने मिळणार आहेत. त्यामुळे मंडळांना परवानग्यांसाठी विविध कार्यालयांत जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

तसेच, ऑनलाईन अर्ज करताना अडचण येणाऱ्या मंडळांसाठी प्रभाग स्तरावर एक खिडकी योजना अंतर्गत कर्मचारी वर्गाची मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. महापालिका उपायुक्त समीर भूमकर यांनी या प्रसंगी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितली.

गणेशोत्सवाच्या काळात नागरिक व मंडळांना अडचण येऊ नये. यासाठी महापालिकेने विसर्जन घाट व मिरवणूक मार्गांची दुरुस्ती तातडीने करण्याचे नियोजन केले आहे. जे रस्ते इतर प्राधिकरणांच्या अखत्यारीत आहेत, त्यांनाही दुरुस्तीबाबत सूचना करण्यात आल्या असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

तसेच नागरिकांनी व गणेश मंडळांनी शक्यतो शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करावा, तसेच ६ फूटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्ती कृत्रिम तलावांत विसर्जित कराव्यात, असेही आवाहन त्यांनी केले. या बैठकीत परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले की, यावर्षी गणेशोत्सव पारंपरिक, शिस्तबद्ध आणि मर्यादित ध्वनीच्या माध्यमातून साजरा करावा.

डीजे-मुक्त गणेशोत्सव साजरा करणे हीच काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीस ठाण्याचे अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, परिमंडळ-३ चे डीसीपी अतुल झेंडे, केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, प्रांत अधिकारी विश्वास गुजर, तहसीलदार सचिन शेजाळ, उल्हासनगर महापालिकेचे अधिकारी, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच कल्याण-डोंबिवलीतील गणेश मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एमडी पावडरसह १ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त; एक आरोपी ताब्यात



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील पोलीस स्टेशन रामनगर हद्दीत एमडी पावडर, या अमली पदार्थाची वाहतुक होत असल्याच्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखा च्या पथकाने दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी सरकार नगर, येथे सापळा रचून एका दुचाकीस्वाराला थांबवून झडती घेतली असता एकूण ६.०६ ग्राम एमडी पावडर हा अमली पदार्थ अवैधरित्या विक्रीसाठी वाहतूक करीत असल्याचे मिळून आले. यावरून दुचाकी चालक नामे सौरभ दुर्वास कसारे वय वर्ष २४ रा. मेजर गेट, वैद्यनगर चंद्रपूर, याला स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. आरोपीकडून एक दुचाकी क्रं. एमएच/३४/ बीएन/०७५२, एमडी पावडर, एक मोबाईल असा एकूण १ लाख ०३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपीविरुद्ध रामनगर पोस्टे. येथे एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे,यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखे चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे, यांच्या नेतृत्वात सपोनि. बलराम झाडोकार, पोउपनि.सर्वेश बेलसरे, पोहवा. नितीन साळवे, नितीन कुरेकार, दिपक डोंगरे, प्रमोद कोटनाके, पोअं.अमोल सावे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

## जे.एस.डब्ल्यू कंपनीच्या थ्री फेज़ प्रकल्प विस्तारीकरणा विरोधात स्थानिक, शेतकरी, भूमीपुत्रांचा एल्गार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पेण (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील वडखळ ते डोलवी येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीच्या थ्री फेज प्रकल्प विस्तारीकरणाला स्थानिक, शेतकरी व भूमीपुत्रांनी कडाडून विरोध दर्शविला तर दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या जनसुनावणीवेळी हजारो शेतकरी, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांनी आवर्जून उपस्थित राहून थ्री फेज विस्तारीकरणाला विरोध करा व प्रकल्प हद्दपार करा, असे आवाहन रायगड जिल्हा शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत भुरे यांनी केले. जे.एस.डब्ल्यू कंपनी परिसरातील जनतेने नव्या प्रकल्पाविरोधात दंड थोपटलेत. व्यापक जन लढा उभरलाय. कोणतेही प्रलोभने व आमिषाला बळी न पडता पुढच्या पिढ्या वाचवायला लढ्यात ताकतीने सामील व्हा, असे आवाहन देखील भुरे यांनी केलेय. जे.एस.डब्ल्यू  कंपनीमुळे वायू, जल, ध्वनी  व भुप्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा गंभीर आरोप यावेळी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमकपणे केलाय. नव्याने होवू घातलेल्या प्रकल्पाने पर्यावरणाचा ऱ्हास तसेच मानवी आरोग्यास अपायकारक, सजीव सृष्टी, जलचर व जैवविविधता देखील नष्ट होणार असल्याची भीती शेकाऱ्यांनी व्यक्त केलीय. शेतीच्या उत्पादनावर प्रदूषणाने मोठा परिणाम झालाय. नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले असून मृत्यूदर वाढत असल्याची चिंता स्थानिक वक्त करतायेत. स्थानिकांना, बेरोजगारांना रोजगार मिळण्याचे भासवले जात असले तरी वास्तवात परप्रांतीयांनीच कंपनीवर ताबा मिळवल्याची वस्तुस्थिती नाकारता येणार नाही, कोणत्याही अमिषाला व भुलथापानां बळी पडू नका, आपली वडिलोपार्जित जमीन वाचली पाहिजे, आपल्या येणाऱ्या पिढ्यांच्या सदृढ निरोगी आरोग्य व उज्वल भविष्यासाठी नव्या प्रकल्पाला हद्दपार करणे काळाची गरज असल्याचे शेतकरी संघटनेचे नेते अनंत भुरे व पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# रेणा धरणात ८८ टक्के जलसाठा, पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१९, पानगाव (रेणापूर) :** रेणा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात यावर्षी झालेल्या दमदार पावसाने धरणातील पाण्याची पातळी वाढली असून सध्या धरणक्षेत्रात ८८ टक्के पाणीसाठा झालेला आहे. सध्या धरणात पाण्याचा येवा सुरू असल्याने आणखी पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे. १५ ऑगस्टपासून तालुक्यात सर्वत्र रिमझिम पाऊस पडत आहे. त्यामुळे ३० टक्के पाण्यात वाढ झाली आहे. शेतातील आंतरमशागतीची कामे ठप्प झाली आहेत. धरणात पाणीसाठा होत असल्यामुळे रेणापूरसह तालुक्यातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे. रेणा नदीवरील चारही बॅरेजेस मध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला असून चारही बेरेजेसचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. तालुक्यात २६ जुलैनंतर मोठा पाऊस झाला नव्हता, पावसाळा सुरू होऊन तीन महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मध्यंतरी पावसाने ओढ दिल्यामुळे रेणा प्रकल्पात सध्या टक्के जलसाठा उपलब्ध झाला असून रेणा नदीवरील चारही बॅरेजेसमध्ये मुबलक साठा झाला आहे. धरणातील जलसाठ्याची स्थिती चिंताजनक झाली होती.

भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो की काय अशी भीती व्यक्त केली जात होती परंतु १५ ऑगस्टनंतर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार



पावसाने तब्बल ३० सेंमीने धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे या वर्षीच्या पाण्याचा प्रश्न तूर्त तरी मार्गी लागलेला आहे. रेणा नदीवरील रेणापूर, घनसरगाव, खरोळा व पांढरी येथील चारही बरेजमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध झालेला आहे.

जून महिन्यानंतर तब्बल एक महिना पाऊस पडला नव्हता. त्यानंतर रेणा धरण क्षेत्रात २६ जुलै ला तालुक्यातील ५ महसूल मंडळात २९४ मिमी पाऊस झाला. त्यानंतर १७, २२, २६ व २७, रविवार, (दि.१७) रात्रभर झालेल्या पावसामुळे रेणा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून रेणा नदीवरील घनसरगाव, रेणापूर, जवळगा व खरोळा या चारही बंधाऱ्यांचे दरवाजे उघडण्यात आले असून बंधाऱ्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग चालू आहे. तेव्हा रेणा नदी काठच्या गावांना, नागरिकांना व शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन शाखा अभियंता श्रीनाथ कुलकर्णी यांनी केले आहे. जुलैला सलग ४ दिवस पाऊस झाला या चार दिवसांच्या पावसाने रेणा मध्यम प्रकल्पात पाच टक्यांनी पाण्याची पातळी वाढली. तर रेणा नदीवरील घनसरगाव, रेणापूर, खरोळा व जवळगा या चारही बॅरेजेसमध्ये पाणी आले. ऑगस्ट महिन्यात पाऊस पडल्याने धरणात ८८ टक्के जलसाठा झालेला आहे.

धरण क्षेत्रात पाण्याचा येवा सुरू आहे अशी माहिती शाखा अभियंता श्रीनाथ कुलकर्णी यांनी दिली. रेणापूर तालुक्यात जून, जुलै व ऑगस्ट महिन्यात रेणापूर महसूल मंडळात ३४५.१ मिमी, पोहरेगाव महसूल मंडळात २७७.९ मिमी, पानगाव महसूल मंडळात २५७.५ मिमी, कारेपूर मंडळात १८९. ९ मिमी तर पळशी महसूल मंडळात -२७९.५ मिमी असा पाऊस पडलेला आहे. तालुक्यातील पावसाची एकूण सरासरी ३३५ मिमी इतकी झालेली आहे. तालुक्यात खरिपाच्या पिकांना आवश्यक असणारा पाऊस होत असल्याने सध्या सोयाबीनसह इतर सर्वच पिकांची अवस्था सम धानकारक असून सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांना पिकांतील आंतरमशागतीची कामे करता येत नाहीत. दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस पडत असल्याने सध्या खुरपणी, कोळपणी व कीटकनाशक औषधे फवारणीची कामे ठप्प झाली आहेत.

# बोंडारवाडी धरणाचे जिवंत वास्तव; ५४ गावांचं स्वप्न आणि ३ गावांचा विरोध

## २०१२ पासून स्व.विजयराव मोकाशी यांनी धरणासाठी सुरू केलेला संघर्ष अजूनही अपूर्ण

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, मेढा (जावली) :** बोंडारवाडी धरणासाठी स्वर्गीय विजयराव मोकाशी यांनी साधारणपणे २०१२ सालापासून बोंडारवाडी धरण कृती समितीच्या माध्यमातून अखंड व प्रामाणिकपणे प्रयत्नांची मालिका सुरू ठेवली. त्यांनी धरणाच्या स्थापनेसाठी शेकडो बैठक, आंदोलने, जनजागृती मोहिमा आणि शासकीय स्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या निधनानंतरही हा लढा थांबला नाही.

मात्र २०२५ उजाडले तरीही धरणासाठीचे मूलभूत कार्य अद्याप पूर्णत्वाला गेलेले नाही. सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी शासकीय अधिकारी ट्रायल पीट (चाचणी खड्डे) घेण्यासाठी संबंधित ठिकाणी गेले असता, धरणामुळे बाधित होणारी बोंडारवाडी, भुतेघर, वाहिटे या तीन गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून काम थांबविले. सुधारीत धरण रेषेबाबत साशंकता,अस्वस्थता व विस्थापनाच्या चिंतेतून हा विरोध केला असल्याची त्यांची भावना आहे. परिणामी प्रशासकीय अधिकाऱ्यांना ट्रायल पीटचे काम न करताच परतावे लागले. या पार्श्वभूमीवर बोंडारवाडी धरण हे विकास आणि विस्थापनाच्या संघर्षाचे प्रतीक ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. एकीकडे पाणी टंचाईने त्रस्त ५४ भागासाठी हे धरण जीवनरेषा ठरू शकत असताना स्थानिकांसाठी ही योजना संकटांची नांदी ठरेल अशी भीती वाटते. परंतु या साऱ्या पार्श्वभूमीवर एक गंभीर वास्तव अधोरेखित होताना पाहायला मिळत आहे.

बोंडारवाडी धरण संपूर्ण ५४ लाभार्थी गावांसाठी एक वरदान ठरून त्यांचे भविष्य उजाळणारे ठरणार आहे. सिंचन, पाणीपुरवठा, शेती व जीवनमान उन्नतीसाठी या धरणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेष म्हणजे, बाधित गावांच्या पुनर्वसनासाठी शासन सकारात्मक भूमिका घेत आहे आणि त्यांच्या समस्यांचे समाधान करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अश्या परिस्थितीत, तीन बाधित गावांचा असलेला तीव्र विरोध म्हणजे ५४ गावांना व्यवहार्य वाटत नसल्याची स्थिती निर्माण



झाली आहे. विकासाच्या मार्गावर पाऊल टाकण्यासाठी समाज म्हणून एकात्मता,संवाद आणि सामंजस्याची गरज आहे. आणखी महत्वाची बाब म्हणजे, शासनाचा या धरणासंदर्भातील व्यवहार्यता अहवाल देखील धरणाच्या बाजूने सकारात्मक आलेला असल्याचे सांगितले जात आहे त्यामुळे शासनानेच या मुद्यावर तातडीने तोडगा काढणे गरजेचे बनले आहे. केवळ ग्राम स्तरावरील मतभेद न पाहता, हा विषय आता केवळ ५४ गावांचा नसून एक शासकीय विकास प्रकल्प म्हणून त्याकडे पाहणे आवश्यक आहे,असे ५४ गावांचे ठाम मत असल्याचे पाहायला मिळत आहे.

बोंडारवाडी धरण हे सामूहिक विकासाच्या संधीचे प्रतीक आहे. विस्थापित गावांसाठी न्याय आणि लाभार्थी गावांसाठी भविष्य या दोन्हींचा समतोल राखून शासनाने निर्णायक भूमिका घेणे काळाची गरज आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्वर्गीय विजयराव मोकाशी यांचे स्वप्न साकार होईल आणि धरण कृती समितीचा संघर्ष यांच्या न्यायाची प्रतिक्षा संपेल.

आगामी काळात स्थानिक नागरिक, शासन आणि कृती समिती यांच्यातील सकारात्मक संवाद व महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले या प्रकल्पाला यशस्वीपणे पुढे नेतील असा विश्वास ५४ गावच्या नागरिकांना असल्याची स्थिती आहे अशी माहिती पत्रकार विकास दळवी यांनी दिली.

# पोळा सणानिमित्त ग्रामीण भागात मातीचे बैल बनवण्याची परंपरा कायम



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** आजही मातीचे बैल बनवण्याची परंपरा. येत्या २२ ऑगस्ट रोजी बैल पोळा असून, सर्जा-राजाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण.ग्रामीण आणि शहरी भागात आजही हा दिवस तितक्याच आत्मियतेने साजरा केला जातो. या दिवशी बैलांचे पूजन केले जातेच, शिवाय घरोघरी मातीच्या बैलांचे देखील पूजन केले जाते.

काळानुरूप मातीचे बैल बनविणे खर्चिक झाले असले तरीही या पारंपरिक सणासाठी माती कारागीर बैल बनविण्याची परंपरा टिकवून आहेत.बैलपोळा सणासाठी मातीचे बैल बनवणारे कुंभार लोक सध्या कामात व्यस्त आहेत. बैलपोळा जवळ आला की, मातीचे बैल बनवण्याची लगबग सुरू होते. कुंभार लोक मातीतून विविध आकाराचे आणि वेगवेगळ्या डिझाईनचे बैल बनवतात. बैलपोळा हा महाराष्ट्रात साजरा होणारा एक महत्वाचा सण आहे. या सणासाठी बैलांची पूजा केली जाते आणि त्यांना सजवले जाते. त्यामुळे, मातीच्या बैलांना खूप महत्व आहे. कुंभार लोक मातीचे बैल बनवून ते विकतात.काही ठिकाणी, अजूनही कुंभार लोक घराघरात जाऊन बैलांच्या जोड्या देतात आणि त्या बदल्यात धान्य घेतात.

या श्रावण महिन्याच्या आमावस्येला येणाऱ्या सणासाठी सध्या कुंभार बांधवांकडून मातीचे बैल बनवण्यात येत आहेत. घरोघरी मातीच्या बैलांची पूजा करणे ही रुढी परंपरा अनेक वर्षांपासून आहे. गावागावातील कुंभारवाड्यांमध्ये मातीचे बैल बनवण्यासाठी स्पर्धाच निर्माण झाल्याचे दिसत आहे. मातीचे बैल तयार असून सध्या रंगरंगोटी देण्याचे काम काही ठिकाणी सुरू आहे तर काही ठिकाणी कामाला वेग आला आहे. आधुनिक युगातही पीओपी किंवा चिनी मातीचे बैल बाजारात विक्रण्यास येतात, ते नागरिक खरेदी करतात. पूजा झाल्यानंतर शोकेसमध्ये ठेवतात असे असले तरी माती बैल पूजेला महत्त्व दिले जाते.

सध्याच्या यांत्रिक युगात बैलांऐवजी ट्रॅक्टर, रोटर अशा यांत्रिक साधनांचा शेतीच्या मशागतीसाठी वापर होऊ लागल्याने तसेच शेतकरी दुध व्यवसायाकडे वळल्याने गोठ्यातील बैलांची संख्या कमी होत आहे. तरीही उपलब्ध बैलांना पोळ्याच्या दिवशी अंघोळ घातली जाते. शिंगे रंगवून त्यामध्ये शांबी व अंगावर झूल घातली जाते. पण मातीचे बैल, अशी कलाकुसर करणारे काही मोजकेच कलाकार आहेत. ग्रामीण भागाबरोबरच शहरातील ही अनेक कुटुंबांतील देवघरात चिखली बैलांचे पूजन करून पोळा सण साजरा केला जातो.

# सातारा पालिका सभागृहात लावले प्रभागनिहाय रचनेचे नकाशे

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, सातारा :** सातारा नगरपालिकेच्या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या दिलेल्या सुचनेनुसार निवडणूक विभागाने प्रभाग रचना निश्चित करण्यासाठी नकाशे नागरिकांना पाहण्यासाठी नगरपालिका सभागृह



येथे लावण्यात आले आहेत. याबाबत सातारकरांच्या हरकती स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. त्या हरकती ३१ ऑगस्टपर्यंत स्वीकारल्या जाणार आहेत. ही प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत चालणार असून त्यानंतर कोणत्या प्रभागात कोणते आरक्षण असणार हे निश्चित होणार आहे.

पालिकेच्या निवडणुकीकरता प्रभाग हे दोन सदस्यांचे असणार आहेत. त्या प्रभागात कोणते आरक्षण असेल, कसा प्रभाग असेल याबाबत हरकती व प्रभाग रचना निश्चित करण्यासाठी सातारा नगरपालिकेने निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार छ.शिवाजी महाराज सभागृहात प्रत्येक प्रभागाचे नकाशे चिटकवण्यात आले आहेत.

# थोडक्यात

## ब्रम्हाकुमारीज कडून दिव्य अलौकिक सन्मान सोहळा



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१९, शहापूर (ठाणे) :** टाकेश्वर मठाधिपती परमपूज्य योगी फुलनाथजी महाराज यांची नुकतीच राष्ट्रीय धर्मगुरुपदी निवड झाल्याने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय संस्थेच्या वतीने मुरबाडमध्ये एक भव्य दिव्य सन्मान सोहळा आणि संत समागमाचे आयोजन करण्यात आले. माऊली हॉलमध्ये पार पडलेल्या या सोहळ्यात उपस्थित संत-महंतांच्या पावन उपस्थितीत हजारो भाविकांनी सहकुटुंब दर्शनाचा लाभ घेतला. आजारीपणामुळे योगी फुलनाथजी महाराज प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या वतीने योगी गोपीनाथ महाराज यांना राजयोगिनी ब्र.कु.अलका दीदीजी यांच्या हस्ते दिव्य सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी अलका दीदीजी यांनी परमात्मा अवतरणाचा संदेश देऊन जीवनाच्या उच्च ध्येय पर्यंत पोहोचण्यासाठी श्री कृष्ण जन्माष्टमीचे रहस्य पाठवुन सांगितलं व सकारात्मक वृत्ति ने समाजाला परिवर्तन करण्याचा मुल मंत्र दिला तसेच ब्र कु पुनम दीदी यांनी संस्था परिचय देऊन मनाला शान्ति देणारी खुप छान अशी मेडिटेशन अनुभूति सर्वांना दिली.

## गुडघाभर पाण्यात नागरिकांनी काढली वाट



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१९, बदलापूर :** गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे बदलापूर शहरातील जनजीवन विस्कळीत झाले असून चाकरमानी मंडळीचे पुरते हाल झाले आहेत. हवामान खात्याने दिलेल्या दोन दिवसाच्या अतिवृष्टीच्या ईशाऱ्यानंतर भलेही शाळा कॉलेज बंद असले तरी खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या चाकरमानी मंडळीला आज सकाळपासून जागोजागी भरलेल्या पावसाच्या पाण्याला सामोरे जावे लागले. अनेक सोसायट्यामध्ये पाणी भरले होते.या भरलेल्या पाण्यामुळे नागरिकांना कामासाठी बाहेर पडणे अवघड झाले होते. सकाळ पासून पावसाच्या जोरदार सरीवर सरी येत होत्या. या पावसामुळे शहरातील सखल भागात अनेक ठिकाणी गुडघाभर पाणी साचले होते. पाण्यातून वाट काढत चालणे जिकरीचे झाले होते. दुपारी बारानंतर पावसा बरोबर जोरदार वारा पण सुटला होता. दुपार नंतर नागरिकांनी घरात बसने पसंत केले. काही महत्वाचे काम असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे असे जाहीर आवाहन सरकारच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिव उद्योग संघटनेचे राज्य सचिव जगताप यांचा सातारा दौरा यशस्वी



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण (सातारा) :** शिव उद्योग संघटनेचे अध्यक्ष दिपक काळीद यांच्या सुचनेनुसार राज्य पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्रभर दौरे सुरु आहेत. संघटना सचिव अधिकराव जगताप यांचा नुकताच सातारा दौरा संपन्न झाला. यावेळी संघटनेचे सचिव अधिकराव जगताप ह्यांचे कराडात जल्लोषात स्वागत करण्यात आले. शिव उद्योग संघटनेचे सातारा जिल्हा महिला प्रमुख किरण हादवे व कराड तालुका प्रमुख नितीन पाटील यांनी या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी सातारा जिल्हाध्यक्ष पदी प्रमोद वेर्णेकर यांची नियुक्ती करण्यात आली. तर सातारा जिल्हा संपर्कप्रमुख पदी शंकर पवार ह्यांची वर्णी लागली. हरी कुलकर्णी ह्यांची कराड ता.शिक्षण व आरोग्य समिती प्रमुखपदी प्रिती दाभाडे पाटण ता.रोजगार समिती प्रमुख पदी ज्योती जाधव ह्यांची भोजन समिती प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. ह्या प्रसंगी मान्यवरांमध्ये शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष अक्षय मोहीते, कराड शहर अध्यक्ष राजेंद्र माने, कराड द.तालुकाध्यक्ष शैलेश आडके, कराड उत्तर प्रमुख राजु खराडे, कराड तालुका प्रमुख सुर्यकांत पाटील, तालुका उपप्रमुख हरी बल्लाळ, शाखा प्रमुख पवन ढगसाळे, राजु आलारकर, राजेंद्र रसाळ, शिव उद्योग संघटनेच्या पाटण तालुका महिला प्रमुख सुमन शेलार, वाई तालुका कला समिती प्रमुख सुवर्णा देशमुख यांची विशेष उपस्थिती होती.

## नशामुक्त भारतसाठी सायकल रॅली



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** शिरवळ येथे शिरवळ पोलीस ठाणे तसेच शिरवळ जिमखान्याच्या सायकलिंग क्लब यांच्या वतीने नशामुक्त भारत अभियानांतर्गत ड्रग फ्री इंडियासाठी सायकल रॅलीचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचा शुभारंभ अंबिकामाता मंदिरापासून वंदन करून झाली. या रॅलीत बहुसंख्येने विद्यार्थी, जिमखाना सदस्य पोलीस कर्मचारी व नागरिक सामील झाले होते. अत्यंत उत्साहात व घोषणा देत ही रॅली पार पडली.

या रॅलीच्या सांगता कार्यक्रमात मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक यशवंत गायकवाड मोबाइलचा वापर कामापुरता करण्याचे आवाहन करून त्याचे व्यसन लागू देऊ नका असे सांगितले. जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे व्यसनमुक्त होण्यासाठी खेळाची आवड निर्माण होणे आवश्यक आहे. व यासाठीच शिरवळ जिमखान्याने विद्यार्थ्यांसाठी मोफत सोय केली आहे असे सांगितले. सायकलिंग प्रभारी डॉ.राजेंद्र देशमुख यांनी पाल्याने विशेषतः मुलींनी वडिलांना सांगितले. ते नक्कीच व्यसनापासून परावृत्त होतील.

आदर्श विद्यालय मुख्याध्यापक व्ही.के. गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले. यासोबत शालेय याविषयावर पोस्टर स्पर्धा ही घेण्यात आली. रॅली यशस्वी करण्यासाठी जिमखाना सचिव प्रा.डॉ.गणेश भुतकर सायकलिंग कमिटी सदस्य हर्ष जोशी, अजय चौगुले, अक्षय राऊत, विशाल राऊत व जिमखाना सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले.